स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्याशाखेतील राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी
सादर करावयाचा शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

संशोधन शिर्षक

“भारतातील बदलत्या संघराज्य व्यवस्थेत राज्यपालांची भूमिका: एक चिकित्सक अभ्यास”

संशोधक विद्यार्थी

ज्ञानेश्वर महादेव बनसोडे

संशोधन मार्गदर्शक

डॉ.महादेव गव्हाणे

एम.ए.,सेट, पीएच. डी.

प्राचार्य तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर, जि.लातूर.

संशोधन केंद्र

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर.

सप्टेंबर, 2023

“भारतातील बदलत्या संघराज्य व्यवस्थेत राज्यपालांची भूमिका: एक चिकित्सक अभ्यास”

प्रस्तावना:

संघराज्य व्यवस्थेत दुहेरी शासन हे प्रमुख वैशिष्टये असते. केंद्रीय सरकार आणि प्रादेशिक सरकारे यांच्यात संविधानाने अधिकार विभागणी करुन दिलेली व्यवस्था असते. तिला संरघराज्य म्हणून ओळखले जाते. या अपेक्षेतून ही व्यवस्था उदयाला येते. म्हणून देशभरात एकच एक सरकार निर्माण करण्याच्या ऐवजी सगळ्या देशासाठी काही किमान जबाबदाऱ्या पार पाडणारे एक सरकार आणि विविध भागांसाठी त्या-त्या प्रदेशाचा कारभार सांभाळणारे स्वतंत्र सरकार अशी व्यवस्था संघराज्यात सामान्यपणे केलेली असते. या दोन्ही प्रकारच्या सरकारांना आपापल्या कार्यक्षेत्रात पुरेस स्वातंत्र्य असते आणि एकमेकांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करण्यावर संवैधानिक निर्बंध असतात. याशिवाय दोन्ही प्रकारच्या सरकारांना आपले स्वत:चे आर्थिक उत्पन्नाचे मार्ग असतात. संघराज्यात राज्यघटना सर्वश्रेष्ठ ठरुन संघातील सरकारांना राज्यघटनेनुसार कार्य करावे लागते. भारतात संघराज्य शासन पध्दतीचा स्वीकार ज्या परिस्थितीत करण्यात आला त्या परिस्थितीचा परिणाम संघराज्याच्या स्वरुपावर झालेला आहे. परिणामत: भारतात संघराज्य आहे पण परंपरागत संघराज्य पध्दतीपेक्षा वेगळे आहे. अनेक गोष्टी अशा आहेत ज्या संघराज्याच्या संकल्पनेत कोठेच बसत नाहीत. भारताचा प्रचंड मोठा भौगोलिक आकार, येथील अफाट लोकवस्ती, आर्थिक, भाषिक, प्रादेशिक अशा अनेक विविधतांना, प्राचीन काळापासून जोडणारे एकात्मतेचे सुत्र येथील संमिश्र संस्कृतीचा वारसा इत्यादी कारणांनी संघराज्य शासन पध्दतीचा स्वीकार करण्याशिवाय पर्याय नव्हता.

भारतीय संविधानात भारत हे संघराज्य (Federation) आहे. अशा आशयाचा उल्लेख नाही. उलट भारत हा राज्याचा संघ आहे. 'India that is bharat shall be Union of States' असा शब्दप्रयोग आढळतो. राज्यांच्या हक्कांना बाधा न येता राष्ट्रीय ऐक्य आणि सामर्थ्य टिकून रहावे म्हणून केलेले राजकीय संयोजन म्हणजे संघराज्य होय. भारतीय संघराज्यात Federation या शब्दाऐवजी Union हा शब्द प्रयोग केला कारण तो शब्द जास्त एकतावादी आहे. संविधानसभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, 'भारत हे एक संघराज्य वाटत असले तरी घटकराज्यांनी आपापसात समझोता किंवा करार करुन निर्माण झालेला तो संघ नाही. त्यामुळे या संघातून बाहेर पडण्याचा, फुटुन निघण्याचा अधिकार कोणत्याही घटक राज्याला नाही.' संविधान निर्मात्यांनी सिध्दांतापेक्षा देशातील परिस्थितीचा गरजांचा आणि भवितव्याचा विचार महत्त्वाचा मानला, म्हणूनच एकीकडे संविधानाने आवश्यकतेप्रमाणे संघीय किंवा एककेंद्रीय स्वरुप धारण करु शकेल अशी लवचित व्यवस्था निर्माण केली. तर दुसरीकडे सगळी राज्य एक सारखी असायला पाहिजेत असे न मानता नि:संकोचपणे राज्यसभेत राज्यांचे प्रतिनिधित्व त्यांच्या लोकसंख्येनुसार कमी-जास्त ठेवले. काही प्रदेशांना राज्यांचा दर्जा तयार करणे, केंद्रशासित प्रदेशाचे भवितव्य ठरवणे या बाबी खुल्या ठेवल्या म्हणजे पुढे गरजे प्रमाणे त्या ठरवल्या गेल्या आणि जात आहेत.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. त्यामुळे या विविधतेमध्ये एकता प्रस्थापित करावयाची असेल तर भारतीय संघराज्यात केंद्राकडे जास्तीचे अधिकार असले पाहिजे हा हेतू संविधान निर्मात्यांचा होता. स्वातंत्र्य प्राप्ती पासून आजपर्यंत पाहिले तर भारतीय संघराज्यवादाचे प्रारुप बदलत गेलेले दिसून येते. इ.स.1989 पर्यंत संघवादाचे एकात्मरुप दिसून आले आणि इ.स.1989 नंतर आघाडी सरकारचा उदय झाला. प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढले व इ.स.1989 ते 2024 पर्यंत भारतीय राजकीय व्यवस्थेत सौदेबाजी संघवादाचे प्रारुप आढळून आले. परंतु अलीकडे केंद्रात बहुमताचे

सरकार आले. घटक राज्यात केंद्रातील सत्ताधारी पक्षाचे सरकारे आहेत. त्या ठिकाणी पुन्हा एकदा भारतीय संघवाद एकात्मतेकडे झुकलेला दिसून येतो. परंतु भारतीय संविधानाद्वारे एकात्म संघराज्य निर्माण करण्यात आले असले तरी ज्या उद्देशाने घटनाकारांनी एकात्म शासनाची लक्षणे असलेले संघराज्य स्वीकारले त्याचा गैरवापर राजकीय स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. त्या अनुषंगाने एक स्वतंत्र अभ्यास झाला पाहिजे अशी गरज वाटली म्हणून संशोधकाने या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

संघराज्य शासन व्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून राज्यपालाला ओळखले जाते. घटकराज्याचा शासन प्रमुख असलेला राज्यपाल हा केंद्राचा प्रतिनिधी म्हणून काम करीत असतो. त्याची नेमणूक राष्ट्रपतीकडून करण्यात येऊन तो राष्ट्रपतीची मर्जी असे पर्यंत सत्तेवर राहतो. या तरतुदीमुळे केंद्र व घटक यांच्यात अनेक वेळा तणाव निर्माण झाल्याचे दिसून येते. राज्यपाल पदावर नेमणूक करीत असताना केंद्रातील सत्तारुढ पक्ष बऱ्याच वेळा पक्षीय सोय पहातो. निवडणुकीत पराभूत झालेल्या किंवा पक्षात नकोशी असलेल्या व्यक्तीची राज्यपालपदी नेमणूक केली जाते. अशावेळी राज्यपाल नि:पक्षपातीपणे वागण्याची शक्यता फार कमी असते. त्यामुळे संबंधीत राज्य सरकार व राज्यपाल यांच्यात अनेकवेळा तणाव निर्माण होताना दिसतात. घटक राज्यांच्या हितसंबंधीतची जोपासणा करणारा राज्यप्रमुख म्हणून राज्यपालांची भूमिका अतिशय संदिग्ध ठरली आहि. केंद्र-राज्य यांच्यातील दुवा, केंद्र व राज्य यांच्यातील तणाव कमी करणारा मध्यस्थ आणि घटनात्मक शासनाचे रक्षण करणारा प्रतिनिधी या उद्देशाने निर्माण करण्यात आलेले राज्यपालाचे पद हे आज वेगळ्याच वळणावर गेले आहे. पक्षस्वार्थ व पक्ष राजकारणातही राज्यापाल या प्रतिष्ठापदाची सुटका होऊ शकली नाही. त्यामुळे हे पद आपली गरिमा व महत्त्वच गमावून बसले की काय? अशी हेतूत: शंका निर्माण झाली आहे. केंद्र-राज्य संबंधातील

तणाव वाढविण्यासाठी अनेकदा राज्यपालच जबाबदार ठरल्याचे चित्र अनेक राज्यांत घडलेल्या उदाहरणावरुन दिसून येते. म्हणून संबंधित विषयाचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

समस्या सुत्रण:

संघराज्य शासन व्यवस्थेत सत्ता विभाजन हे प्रमुख तत्व मानले जाते. केंद्र सरकार आणि घटकराज्य सरकारे यांच्यात सत्तेची विभागणी झालेली असते. या अधिकार विभागणीवरुन केंद्र आणि राज्य सरकारे यांच्या संबंधात तणाव निर्माण होताना पाहायला मिळतो. याचे संकल्पानात्मक अध्ययन करताना भारतीय संघराज्य व्यवस्थेचे प्रारुप बदलले आहे. का? मुख्यमंत्री व राज्यपाल यांच्यातील संघर्षाचे कारण काय? राज्यपालांच्या स्वविवेकाधिन अधिकाराचा वापर कसा होतो? भारतीय केंद्र सरकार निपष्कपातीपणे कार्य करते का? यासर्व समस्यांच्या उत्तरांचा शोध सदरील संशोधनातून घेतला जाणार आहे.

विषयाचे महत्त्व:

दुहेरी शासन हे संघराज्य व्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे. त्यामुळे केंद्र आणि घटक राज्य अशी दोन सरकारे अस्तित्वात येतात.प्रशासकीय दृष्टिकोनातून निर्माण झालेली ही दोन सरकारे कालोघात एकमेकांच्या विरुध्द ही उभे राहतात. भारतीय संघराज्यात घटकराज्य शासनात राज्यपाल हे पद केंद्राकडून नियुक्त आहे. या पदाच्या संदर्भाने प्रारंभीपासूनच वादाची धुमारे उडत राहिली आहेत. त्यामुळे यापदाची संघराज्य व्यवस्थेतील भूमिका नव्या दृष्टिकोनातून अभ्यासणे गरजेचे आहे. त्या दृष्टिने ‘भारतातील बदलत्या संघराज्य व्यवस्थेत राज्यापांची भूमिका: एक चिकित्सक अभ्यास’ या विषयावरील अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

संशोधनाची उद्दिष्टे:

कोणत्याही स्वरुपाचे कार्य करण्यासाठी त्या विषयाची उद्दिष्टे ठरवावी लागतात. जर उद्दिष्ट्ये ठरली नाहीत तर ते कार्य दिशाहीन होते व त्या विषयाला योग्य न्याय मिळत नाही. तसेच अभ्यासाला एक नेमकी दिशा मिळावी, अभ्यासात सखोलता यावी म्हणून अभ्यास विषयाची उद्दिष्ट्ये मांडली जातात. उद्दिष्टांची रचना स्पष्ट व वस्तुनिष्ठ स्वरुपाची केली तर अभ्यासाची सप्रमाणता व विश्वसनीयता यांच्यात वाढ होऊन अभ्यासाची सार्वत्रिक सत्यता या मूल्यात वाढ होते.

प्रस्तुत संशोधनासाठी खालील प्रमाणे उद्दिष्ट्ये ठरवलेली आहेत.

1. भारतीय संघराज्य व्यवस्थेचा अभ्यास करणे.
2. घटनात्मक पदाची भूमिका तपासणे.
3. केंद्र-राज्य संबंधाचा अभ्यास करणे.
4. राज्यपाल पदाच्या भूमिकेचे सकारात्मक व नकारात्मक पैलू तपासणे.
5. संघराज्य व्यवस्थेत केंद्र सरकारच्या भूमिकेचे अध्ययन करणे.
6. मुख्यमंत्री व राज्यपाल यांच्यातील संघर्षाचा अभ्यास करणे.

गृहितके:

सामाजिक शास्त्रामध्ये शास्त्रीय ज्ञानाची निर्मिती करण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केला जातो. या पध्दतीचा अवलंब करण्यासाठी संशोधकाला संशोधन आराखड्याचे पूर्वज्ञान असणे आवश्यक असते. एखाद्या विषयाचा अभ्यास करण्यापूर्वी त्या विषयासदंर्भात काही उपकल्पना मनात गृहित धराव्या लागतात. त्या उपकल्पना आपल्या पूर्वज्ञानाशी संबंधीत असतात. तसेच त्या विषयासंदर्भात संभाव्य अंदाज बांधावे लागतात. त्यामुळेच संशोधकाला आपल्या संशोधनाची दिशा आणि गती ठरवण्यास मदत होते. गृहित विधानावर संशोधनाच्या निष्कर्षाचे बरेचसे स्वरुप अवलंबून असते. गृहितके ही संशोधकास मार्गदर्शक म्हणून मदत करतात. वैज्ञानिक

अभ्यास पध्दतीतील एक अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजेच गृहितकृत्य होय. यालाच परिकल्पना, उपकल्पना, अभ्युपगम असेही म्हणतात.

प्रस्ततुत संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी खालील गृहितकृत्य निश्चित केलेली आहेत.

1. राज्यपालांच्या भूमिकेमुळे संघराज्य व्यवस्थेत केंद्र सरकारचा एकाधिकार निर्माण झाला आहे.
2. राज्यपाल स्वविवेकाधिन अधिकाराचा अविवेकी वापर करतात.
3. राज्यपाल पद घटकराज्य राजकारणात केंद्रात हस्तक्षेपाचे एक साधन आहे.
4. घटकराज्य राजकारणात मुख्यमंत्री व राज्यपाल ही दोन सत्तास्थाने निर्माण झाली आहेत.
5. घटनात्मक पदाचा वापर सक्रिय राजकारणासाठी केला जात आहे.
6. संसदीय लोकशाहीतील नामधारी व वास्तविक प्रमुख हा भेद कमी झाला आहे.
7. केंद्र सरकारसाठी राज्यपाल पद हे नियंत्रणाचे साधन बनले आहे.

संशोधन प्रणाली:

अ**) तथ्य संकलन:**

तथ्य म्हणजे जसे आहे तसे पाहणे किंवा त्याचे वास्तविक चित्र रेखाटने होय. तथ्य अनुभवक्षम असल्याशिवाय विज्ञानात त्याचा विचार केला जात नाही. ज्या तथ्यांचा अनुभव घेता येत नाही किंवा केवळ अपवाद म्हणून एखाद्या वेळीच घडले असेल, इतरांना त्याचा अनुभव येण्याची शक्यता नसेल अशा तथ्यांना स्वीकारण्याविषयी विज्ञान उदासिन असते म्हणून आपले ज्ञानेंद्रिय हीच तथ्ये प्राप्तीचे आधार आहेत. ज्ञानेंद्रियाच्या आधारे होणारा स्थितीबोध किंवा निरीक्षण म्हणजे तथ्य होय. साधारणत: सत्य म्हणून स्वीकार करता येवू शकणाऱ्या आणि सर्वांचे एकमत होऊ शकणाऱ्या तसेच सर्वांना त्याचा अनुभव घेता येऊ शकणाऱ्या घटनांना 'तथ्य'

म्हणतात. म्हणजेच विज्ञानात तथ्य हे असे निरीक्षण आहे की, ज्यांच्या ज्ञानेंद्रियाद्वारे अनुभव घेता येतो.

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. संशोधन कार्याची सुरुवात आणि समारोपही तथ्यांच्या आधारानेच होत असतो. प्रस्थापित सिध्दांताचा पडताळा घेण्यासाठी तथ्यांची मदत होत असते. माहिती उपलब्ध नसलेल्या समस्येची ओळख करुन घ्यावयाची असेल तर तथ्य संकलनाशिवाय दुसरा मार्ग नाही. तथ्य संकलन हो संशोधन कार्याचा आत्मा असतो. सामाजिक संशोधनात तथ्यांचे विभिन्न प्रकार व त्यांना प्राप्त करण्यासाठी विविध साधने उपलब्ध आहेत. अध्ययनाच्या स्वरुपानुसार ज्या तथ्य सामुग्रीला इतर पध्दतीच्या तुलनेत अधिक महत्त्व आहे. त्या पध्दतीला अधिक महत्त्व दिले जाते. तथ्य संकनाच्या प्रकारांना दोन प्रकारात विभाजित केले जाते.

1) प्राथमिक स्त्रोत 2) द्वितीयक स्त्रोत

प्रस्तुत संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत व द्वितीयक स्त्रोत या दोन्ही स्त्रोतांचा उपयोग केला जाईल.

1) प्राथमिक स्त्रोत:

तथ्य संकलनाच्या प्राथमिक साधनामध्ये अनूसूची, मुलाखत घेऊन तथ्य संकलन केले जाईल.

2) द्वितीयक स्त्रोत:

शासकीय दस्तावेज, विविध प्रकाशने, प्रकाशित अप्रकाशित ग्रंथ, साहित्य, शोधप्रबंध व नियतकालिकांचा वापर करुन तथ्य संकलन केले जाईल.

ब) नमुना निवड:

सामाजिक संशोधनात नमुना निवड पध्दतीचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. सामाजिक संशोधनातील अभ्यास विषयात एवढी गुंतागुंत असते की, त्यात

गुंतलेल्या प्रत्येक घटकांचा सांगोपाग अभ्यास करणे केवळ अशक्य बाब आहे. म्हणूनच नमुना निवडीचा वापर केला जातो. वेळ, श्रम आणि पैशाच्या दृष्टिने नमुना निवडीचे तर अधिकाधिक महत्त्व आहे. यामध्ये समष्टीतील प्रत्येक घटकांचा संशोधकाने प्रत्यक्ष अभ्यास न करता सर्व घटकांचे प्रतिनिधित्व करतील अशा काही घटकांचा सखोल अभ्यास केलेला असतो. म्हणजेच समग्रातील एकुण एककांपैकी काही प्रतिनिधिक एककाची निवड करणे म्हणजेच 'नमुना निवड' होय. त्यास न्यादर्शन असे सुध्दा संबोधले जाते. सामाजिक संशोधनात नमुना निवड पध्दती ही वैज्ञानिक अध्ययन विषयाचे स्वरुप, त्याची व्याप्ती, उपलब्ध वेळ इत्यादी सर्व दृष्टिने अनुकुल ठरेल आसाच नमुना निवडीचा प्रकार असला पाहिजे. समग्रातील एककांना नमुन्यामध्ये निवडून येण्याची संभाव्यता आहे किंवा नाही या आधारावर नमुना निवडीचे दोन प्रकार पडतात.

1. संभाव्यता नमुना निवड:

संशोधन समग्रातील सर्व एककांच्या निवडीची संभाव्यता ही सारखीच असते. अशा पध्दतीला संभाव्यता नमुना निवड पध्दती असे म्हणतात. संभाव्यता नमुना निवडीचे प्रामुख्याने पाच प्रकार पडतात.

1. सादा यादृच्छिक नमुना
2. स्तरिय यादृच्छिक नमुना
3. व्यवस्थाबध्द नमुना
4. बहुपदी किंवा एकक पुंज नमुना
5. बव्हवस्तीय नमुना

2) **गैरसंभाव्यता नमुना निवड:**

संभाव्यता नमुना निवडीच्या अगदी विरुध्द असे या पध्दतीचे स्वरुप आहे. जेव्हा समग्रातील सर्व एककांची नमुन्यामध्ये निवड होण्याची शक्यता किंवा संभाव्यता

नसते तेव्हा त्या पध्दतीस गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दती असे म्हणतात. गैरसंभाव्यता नमुना निवडीचे प्रामुख्याने चार प्रकार पडतात.

1. सोयीस्कर किंवा सुविधाजनक नमुना
2. सहेतुक किंवा उद्देशपूर्ण नमुना
3. कोटा किंवा बहुहिस्सा नमुना
4. स्वयंनिर्वाचित नमुना

प्रस्तुत संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी संशोधकाने गैरसंभाव्यता नमुना निवड या प्रकारातील सहेतुक नमुना निवड ही पध्दती निवडली आहे. या पध्दतीचा वापर करुन एकूण पाच उत्तरदात्याच्या आधारे तथ्य संकलन केले जाईल.

क) विश्लेषण पध्दती:

"भारतातील बदलत्या संघराज्य व्यवस्थेत राज्यपालांची भूमिका: एक चिकित्सक अभ्यास" या विषयाचा अभ्यास करित असताना ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, तुलनात्मक इत्यादी संशोधन पध्दतीचा आधार घेतला जाईल.

प्रकरणनिहाय मांडणी:

"भारतातील बदलत्या संघराज्य व्यवस्थेत राज्यपालांची भूमिका: एक चिकित्सक अभ्यास" या विषयावरील संशोधन पुढील प्रकरणांच्या आधारे करण्यात येईल व अहवाल लेखन केले जाईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पध्दती

प्रकरण दुसरे : भारतीय संघराज्याचे प्रारुप

प्रकरण तिसरे : राज्यपाल एक घटनात्मक पद

प्रकरा चौथे : राज्यपालांची घटकराज्याच्या राजकारणात वादग्रस्त भूमिका

प्रकरण पाचवे : केंद्र-राज्य संबंधात राज्यपालाच्या भूमिकेची चिकित्सा

प्रकरण सहावे : राज्यपालांची बदलत्या संघराज्य व्यवस्थेत नवी भूमिका

प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारसी

संदर्भ सूची:

मराठी:

१. गोडबोले माधव, (अनु. गोडबोले सुजाता), 'भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा', राजहंस प्रकाशन, पुणे, २०१४.

२. भोळे भास्कर लक्ष्मण, 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, २०१४.

३. फडके य.दि., 'राज्यपाल घटना आणि वास्तव', के सागर पब्लीकेशन्स, पुणे, २०१५.

४. देशमुख भाऊराव, 'भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन', अंबिका प्रकाशन, अमरावती, १९७२.

५. अलेक्झांडर पी.सी (अनु-देशमुख स्नेहलता, ओक संजय), 'लोकशाही जाणीव आणि जोखिम', सोमैया पब्लीकेशन, प्रा. लि. मुंबई, १९९७.

६. आघाव विलास (संपा), 'भारतीय संविधान आणि राजकारण', दयाधन पब्लिशर्स ग्रुप, हिंगोली, २०२२.

७. आगलावे प्रदिप, 'सामाजिक संशोधन पध्दती व तंत्र', विद्या प्रकाशन, नागपूर. २००३.

८. पाटील वा.भा., 'भारतीय प्रशासन आणि राजकारण', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१९.

९. हर्बर्ट अंगर, (अनु. पन्नालाल सुराणा), 'लोकशाहीचे धोके', प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई. १९६७.

१०. देशमुख अल्का, 'भारतीय लोकशाही प्रक्रिया', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१४.

११. निरगुडकर उदय, सरवटे दिलीप, 'निवडणुक जिंकण्यासाठी सर्व काही', राजहंस प्रकाशन, पुणे, २००९.

१२. लक्ष्मीकांत एम (अनु-गोखले श्रीकांत), 'इंडियन पॉलिटी', के सागर, पब्लिकेशन, पुणे, २०१७.

१३. मोरे विठ्ठल (संपा), 'विचारमंथन', महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे संशोधन पत्रिका, २२ वे वार्षिक अधिवेशन, विशेषांक, औरंगाबाद, २००५.

१४. कुंभार नागोराव (संपा), 'भारतीय आव्हाने एक सिंहावलोकन', प्रबोधन प्रकाशन, लातूर, १९९६.

१५. गोडबोले माधव, 'नव्या दिशा, बदलते संदर्भ', श्रीविद्या प्रकाशन, पुणे. १९९८.

१६. व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास (अनु-चित्रा लेले), 'भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार', डायमंड, पब्लिकेशन्स, पुणे, २०१०.

१७. कांबळे बाळ (संपा), 'भारतीय लोकशाही समोरिल आव्हाने', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१२.

१८. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा), 'मराठी विश्वकोष', महाराष्ट्र राज्य आणि मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८२.

१९. मोरे विठ्ठल, पवार कुसुम, सोलापुरे राजशेखर, मोरे संग्राम, 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण', अरुणा प्रकाशन, लातूर, २०१०.

२०. सोलापुरे राजशेखर, 'लोकशाही आणि निवडणुक प्रक्रिया', अरुणा प्रकाशन, लातूर, २०१७.

हिंदी:

१) पाराशर एच.सी., 'राज्यपाल का पद एवं उथल पुथल की राजनीति',(१) पी.एस.पब्लिकेशन, ७२ इब्राहिमपुरा रोड, भोपाल, १९८५.

२) नरुला बी.सी., 'संविधान और सरकार', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, अंसारी रोड, दरियाजंग, नई दिल्ली, २०१६.

३) काश्यप सुभाष, गुप्त विश्वप्रकाश, 'राजनीतिकोष', दिल्ली विश्वविद्यालय, हिंदी

माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली, २००४.

४) सिन्हा सचिदानंद, 'लोकतंत्र की चुनौतियाँ', वाणी प्रकाशन, दिल्ली, २००५.

५) नागर पुरुषोत्तम, 'आधुनिक भारतीय सामाजिक एवं राजनीतिक चिंतन', राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, जयपूर, १९८९.

६) मिश्र ऱ्हदयनारायण, 'सामाजिक राजनितिक दर्शन के नये आयाम', शेखर प्रकाशन, इलाहाबाद, २००६.

७) पाराशर एच.सी., 'राज्यपाल का पद एवं उथल पुथल की राजनीति',(२) पी.एस.पब्लिकेशन, ७२ इन्ब्राहिमपुरा रोड, भोपाल, १९८६.

८) शर्मा रामअवतार, यादव सुषमा, 'कैंद्र-राज्य संबंध', दिल्ली विश्वविद्यालय, हिंदी माध्यम कार्यान्वय, निदेशालय, दिल्ली, १९८६.

९) गाबा ओमप्रकाश, विवेचनात्मक राजनिति विज्ञान कोष, मयुर पेपरबेक्स, नोएडा, २००७.

१०) लक्ष्मीकांत एम., 'भारत की राज्यव्यवस्था', मेग्राव्हिल एज्युकेशन, सर्व्हिस प्रा.लि.नवी दिल्ली, २०१५.

११) गाबा ओमप्रकाश, 'राजनीती चितन की रुपरेखा', मयूर पेपरबैक्स, नोएडा, २००५.

ENGLISH:

1) Panikkar K.M., 'Federal India', Easten Book Linkers publications, Delhi, 2019.

2) Jain S.K., 'Indian Federasm: Emerging Issues', Kalpaz publication, Delhi, 2018.

3) M. Venkatarangaiya, M. Shivah, 'Indain Federalism', Arnold Heinemann Publishers, New Delhi, 1975.

4) K. Subba Rao, 'The Indian Federalism', The Poona University Press

Ganeshkhind, Poona, 1969.

5) Ghosh S.K., 'Indian Democracy Deralled Politics and Politicians', Aph Publishing Corporation, 5 Ansari Road, New Delhi, 1997.

6) Anup Chand Kapur, 'The Indian Political System', S.Chand & Company Ltd. New Delhi, 1982.

7) Singh Gyaneder, 'Trendes in Politics', Omega Publications, New Delhi, 2008.

8) Jayal Niraj Gopal, 'Democracy in India, Oxford University press, New Delhi, 2001.

9) Kothari C.R., Research Methodology Methods and Techniques', Wiley Estem Ltd. New Delhi, 1998.

10) Grover Virender, 'Political System & Constitution of India', Vol.6 Deep & Deep Publication, New Delhi, 1997.

नियतकालिकेः

१) समाजप्रबोधन पत्रिका- त्रैमासिक, बेळगाव.

२) परिवर्तनाचा वाटसरु- पासिक, पुणे.

३) विचारशलाका- त्रैमासिक, लातूर.

४) योजना- मासिक, मुंबई.

५) लोकराज्य - मासिक मुंबई.

संशोधक
ज्ञानेश्वर महादेव बनसोडे

संशोधक मार्गदर्शक
डॉ.महादेव गव्हाणे
प्राचार्य तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर